PUNEMETROPOLIS

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत,आकुर्डी रेल्वेस्टेशनजवळ,
आकुर्डी –पुणे-४११०४४ दुरध्वनी- ०२०-२७६५२९३४

जा.क्र./प्रशा/ कंत्राटी कर्मचारी मागणी/ ४५५/ 1129

दिनांकः- 16/08/२०२४

## जाहिर सूचना

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे येथील कार्यालयात माहिती व तंत्रज्ञान विभागातील कामकाज पार पाडण्यासाठी वरिष्ठ संगणक अभियांत्रिकी अधिकारी व संगणक अभियांत्रिकी अधिकारी कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी उमेदवारांचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, प्रशासन विभाग, नविन प्रशासकीय इमारत, आकुर्डी, पुणे यांचेकडे दि. १९/०८/२०२४ ते दि.२२/०८/२०२४ या कालावधीत कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज **ad.pmrda@gmail.com** या ईमेलवर किंवा कार्यालयीन पत्त्यावर पाठविण्यात यावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अजांचा विचार करण्यात येणार नाही.

| अ.क्र. | पदनाम | उमेदवाराची पात्रता |
|---|---|---|
| १. | वरिष्ठ संगणक अभियांत्रिकी अधिकारी | १) एम.ई./एम.टेक इन कॉम्प्युटर सायन्सन (CS) / माहिती व तंत्रज्ञान (IT)<br>२) १० वर्षाचा अनुभव |
| २. | संगणक अभियांत्रिकी अधिकारी | १) बी.ई. कॉम्प्युटर सायन्सन(CS) / माहिती व तंत्रज्ञान (IT)<br>२) ५ वर्षाचा अनुभव |

अटी व शर्ती :-

१. सदर उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.
२. प्राधिकरण कार्यालयात प्रतिनियुक्तीने / सरळसेवेने अधिकारी उपलब्ध झाल्यास करार पध्दतीने दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.
३. सदर उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा अधिक नसावे.
४. उमेदवार शारीरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
५. नियुक्त उमेदवारास पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे येथे काम करावे लागेल.
६. उमेदवाराने सदर पदाकरीता जाहीरातीच्या दिनांकापासून ४ दिवसाच्या आत सह आयुक्त, प्रशासन, दुसरा मजला, प्रशासन विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे ४४. या पत्यावर पोहचेल अश्या रितीने अर्ज पोस्टाने पाठवावा अथवा कार्यालयात प्रत्यक्ष दाखल करावा अथवा **ad.pmrda@gmail.com** या ई मेल आयडीवर मुदतीत पाठवावेत. मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
७. अधिक माहितीसाठी **www.pmrda.gov.in** या संकेतस्थळावर भेट .

**(सुनिल पांढरे)**
**सह आयुक्त, प्रशासन विभाग**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे**